MHRG080001262026

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १०/२०२६.**

श्रीमती. मर्सि दिनकरन सोलोमोन **विरूध्द** रसायनी पोलीस स्टेशन

## निशाणी क्र.१ वरील आदेश.

सदरचा अर्ज अर्जदार यांनी **''भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ५०३''** अन्वये अर्जदार यांच्या स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा Austin Town (Banglore), येथील खाते क्र. २०१९६६०७६०२, IFSC CODE SBIN0020280 या खात्यामधून ऑनलाईन सायबर फसवणूक दरम्यान वळती झालेली रक्कम तपासकामी पोलिसांनी गोठवून ठेवलेली असून सदर बॅक खात्यामध्ये गोठविलेली रक्कम अर्जदार यांना परत मिळयाण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे कथन असे आहे की, ते चाभार्ली मोहोपाडा येथे राहण्यास आहेत. अर्जदार यांच्या मुलाचे शिक्षण पुर्ण झालेले असून अर्जदार त्यांचा मुलगा ॲलन याच्या नोकरीच्या शोधात होत्या. दिनांक १६/०६/२०२५ रोजी अर्जदार त्याच्या मुलाच्या मोबाईलवर नोकरीकरिता वेग वेगळया वेब साईडवर शोध घेत होत्या त्यानंतर काही वेळाने अर्जदार यांचा मुलगा यांना त्यांचे मोबाईल क्र. ८२९६९७६४२७ वर कॉल आले व परदेशात वेगवेगळ्या नोकरी संदर्भात माहिती देण्यात आली. परंतू त्याकरिता सुरवातीला रजिष्ट्रेशन फि रक्कम रु.१००/- भरण्यास सांगितले. अर्जदार यांच्या मुलगा यांचा मुलगा यांच्या बॅक खात्यात पैसे नसल्याने अर्जदार यांचा मुलगा यांनी अर्जदारच्या बॅक खात्यामधून रक्कम रु.१००/- गुगल पे द्वारे पाठवली. त्यानंतर अर्जदार यांचा मुलगा यांना त्यांचा बायोडाटा पाठविण्यास सांगितला. परंतु अर्जदार यांचा मुलगा यांना त्यांचा बायोडाटा ॲट्रॅक्टीव्ह नसल्याने समोरील व्यक्तीने आम्ही तुम्हाला तुमचा बायोडाटा चांगला बनवून देतो त्याकरिता रक्कम रु.५००/- लागतील असे सांगितले. त्यानंतर अर्जदार यांच्या मुलाने पुन्हा रक्कम रु.५००/- पाठविले. परंतु अर्जदार यांचा मुलगा याचे बॅक खाते नसल्याने त्याने अर्जदार व अर्जदार यांचे

पती यांच्या बॅक खात्यातून पैसे पाठविले. त्यानंतर अर्जदार यांचा मुलगा यांनी अर्जदार यांचे स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा Austin Town (Banglore), चे खाते क्र. २०१९६६०७६०२ याशी संलग्न गुगल पे क्र. ९७३९०१००८० वरुन एकुण रक्कम रु.९५,९००/- इतकी समोरील व्यक्तीच्या सांगण्या प्रमाणे पाठविलेली आहे. त्याच प्रमाणे अर्जदार यांचे पती यांचे एच.डी.एफ.सी.बॅक शाखा Kormangala येथील खाते क्र. ००५३१०५००९०२८१ शी संलग्न गुगल पे क्र. ९८४५९८८०८० वरुन रक्कम रु.३०,०००/- समोरील व्यक्तीच्या सांगण्या प्रमाणे पाठविलेली आहे. परंतु त्यानंतरही समोरील व्यक्ती वेगवेगळी कारणे सांगून आणखी पैसे मागत असल्याने अर्जदारच्या मुलाने सदरची गोष्ट अर्जदार व तिचे पती यांना सांगितली. त्यावेळी त्यांच्या सोबत सायबर फ्रॉड झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर अर्जदार यांचे पती यांनी त्वरीत सायबर तक्रार नोंदविली. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने पोलिसांनी अर्जदार यांच्या बॅक खात्यातून ज्या बॅक खात्यामध्ये पैसे वळती झालेले आहेत ती बॅक खाती तपासादरम्यान गोठवलेली आहेत. त्या खात्यांमध्ये अर्जदार यांची रक्कम गोठवलेली आहे. त्यामुळे सदरची रक्कम परत मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. सरकारी वकीलांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, पोलिसांनी जी बॅक खाती गोठवलेली आहेत त्या बॅक खात्यामध्ये एकुण रुपये ६६,१७८.४५/- रुपये एवढी रक्कम शिल्लक असल्याने ती बॅक खाती सिल करण्यात आलेली आहेत. सदरची रक्कम अर्जदार यांच्या ताब्यात दिल्यास ते ती रक्कम प्रत्येक नेमलेल्या तारखेस न्यायालयात हजर ठेवतील याची शाश्वती देता येणार नाही. सदरची रक्कम खर्च करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे झाल्यास त्याचा पुराव्यावर विपरित परिणाम होईल त्यामुळे अर्ज ना मंजूर करण्यात यावा. तपासी अंमलदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, सायबर तक्रार अर्ज क्र. ३१९०६२५००९९७७ च्या तपासामध्ये तक्रारदार यांच्या फसवणूकीतील रक्कम फ्रिज करण्यात आलेली आहे. तरी सदर गुन्हयात फसवणूक करण्यात आलेली रक्कम पैकी रक्कम रु.६६,१७८.४५/- ही ज्या बॅक खात्यामध्ये आहे ती बॅक खाती गोठीत करण्यात आलेली आहेत. सदरची रक्कम अर्जदार यांच्या खात्यात परत करण्यास पोलिसांची काहीही हरकत नाही. त्याच प्रमाणे निशाणी क्र.९ वरील तपासी अंमलदार यांचे म्हणणे लक्षात घेतले

असता, त्यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, अर्जदार यांची रक्कम रुपये ६६,१७८.४५/– ही खालील अकाउंटमध्ये होल्ड करण्यात आलेली आहे.

| Sr. No. | Account No/ (Wallet/PG/PA) Id/ Transaction Id/ UTR Number | Put on hold date | Put on hold Amount | Account Detail | Account Holder Name |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 20196607602 686535448452 | `16/06/2025 | 528.43/- | State Bank of India Aushin Town Bangalore urban Karnataka | Ms mercydinakaran |
| 2 | 9992505073797201 516713689617 | `17/06/2025 | 7,300/- | Kamataka Bank Ltd. CUTTAK ORIASA | JAITUN BIBI |
| 3 | 9992505073797201 REFERREMARKS | `18/06/2025 | 6,671.57/- | Kamataka Bank Ltd. CUTTAK ORIASA | JAITUN BIBI |
| 4 | 14621000003445 682033722911 | `18/06/2025 | 20,000/- | Punjab & Sind Bank MANDER MOGA Punjab | SAMONIO MASIH |
| 5 | 37400200000252 516787777042 | `19/06/2025 03:50:32 PM | 29,998.45/- | Bank of Baroda (Including Vijaya Bank and Dena Bank) | KK ENTERPRIZES |
| 6 | 9992505073797201 51660965315 | `06/08/2025 | 650/- | Kamataka Bank Ltd. CUTTAK ORIASA | JAITUN BIBI |
| 7 | 41982393463 AXNPN16777770065 | `31/08/2025 | 1,030/- | State Bank of India Chennuer, Telangana | CSB Food |

४. अर्जदार तर्फे वकील व सरकारी वकील यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी प्रस्तुतच्या अर्जासोबत निशाणी क्र.४ वरील कागदयादी प्रमाणे काही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यामध्ये अर्जदारने सायबर क्राईमची प्रत, गुगल पे स्क्रीन शॉटची प्रत, खाते पासबुकची प्रमाणीत प्रत व बॅक स्टेटमेंटची ऑनलाईन प्रत, अर्जदारच्या आधार कार्डची प्रमाणीत प्रत ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अभिलेखावर दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तपासी अंमलदार यांनी सायबर क्राईम तक्रार क्र. ३१९०६२५००९९७७ च्या चौकशी दरम्यान वरील खात्यांवरील रक्कम होल्ड करुन ठेवलेली आहेत. तपासी अंमलदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे म्हणले आहे की, सदरच्या खात्यावर लिन मार्क लावण्यात आलेले असून अर्जदार यांची फसवणूक झालेली रक्कम परत देण्याबाबत योग्य ते आदेश व्हावेत. सदरच्या रक्कमेवर मालकी हक्क दाखविण्यासाठी अर्जदार यांनी अर्जासोबत त्यांचे प्रतिज्ञापत्र देखील दाखल केलेले आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या सायबर क्राईम तक्रारीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये देखील अर्जदार यांनी त्यांच्या खात्यामधून रक्कम रुपये ९५,९००/- व त्याचे पती यांच्या खात्यावरुन एकुण रक्कम रु.३०,०००/- वजा झाली असल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी दाखल केलेल्या बॅक स्टेटमेंटचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक १६/०५/२०२५ रोजी अर्जदार यांच्या खात्यावरुन रक्कम रुपये ९५,९००/- वजा झाल्याचे दिसून येते. सदरची रक्कम अर्जदार यांना परत देण्यास तपासी अंमलदार यांनी कोणतीही हरकत घेतलेली नाही. त्यामुळे अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन अर्जदार हे सदर रकमेच्या मालक असल्याचे दिसून येते. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त सदर रक्कमेची आजपर्यंत कोणीही मागणी केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हे सदरची रक्कम परत मिळण्यास पात्र आहेत. तपासी अंमलदार यांनी या गुन्हयामध्ये वरील खात्यांमधील रक्कम होल्ड करुन ठेवलेली आहे. सदर खात्यातील रक्कम होल्ड केलेली असल्यामुळे त्या खात्यामध्ये असलेल्या रक्कमेचा वापर अर्जदार यांना करता येत नाही. अश्या परिस्थितीमध्ये सदरची रक्कम अर्जदार यांना परत न दिल्यास अर्जदार यांचे नुकसान होईल सदरची रक्कम वर नमूद बॅक खात्यामध्ये दिर्घकाळा पर्यंत लिन करुन ठेवल्यास कोणताही उद्देश साध्य होणार नाही. त्यामुळे सदरची रक्कम अर्जदार यांना

सुपुर्तनाम्यावर तात्पुरत्या स्वरुपात अटिशर्तीवर अर्जदारास परत देणे योग्य होईल. सदरची रक्कम आवश्यक्ता भासल्यास अर्जदार यांनी खर्च करण्यास त्यांना परवानगी देण्यात येत आहे. परंतु भविष्यात सदरची रक्कम अर्जदार यांची नाही, या निष्कर्षा पर्यंत न्यायालय आल्यास ती रक्कम न्यायालयात जमा करणे अर्जदारावर बंधनकारक राहील. सदर रक्कम अर्जदारास परत दिल्यास सरकारी पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. रसायनी पोलिस स्टेशन यांच्याकडील सायबर क्राईम क्र. ३१९०६२५००९९७७७ मध्ये तपासी अंमलदार यांनी गोठविलेली रक्कम रुपये ६६,१७८.४५/- ही अर्जदार श्रीमती. मर्सि दिनकरन सोलोमोन यांना रक्कम रुपये ६७,०००/- चा सुपूर्तनामा बॉड लिहून दिल्यानंतर त्यांना खालील अटींचे आधीन राहून सदर रकमेचा ताबा देण्यात यावा.

३. सदर रक्कम ही अर्जदार श्रीमती. मर्सि दिनकरन सोलोमोन यांच्या स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा Austin Town (Banglore), येथील खाते क्र. २०१९६६०७६०२, IFSC CODE SBIN0020280 या खात्यामध्ये परत करण्यात यावी.

४. सदरील रक्कमेपैकी रक्कम रुपये ५२८.४३/- ही Ms mercydinakaran यांचे State Bank of India Aushin Town Bangalore urban Karnataka येथील खाते क्र.20196607602 या बॅकेस आदेशीत करण्यात येते की, त्यांनी रक्कम रुपये ५२८.४३/- ही अर्जदारास परत करावी.

५. सदरील रक्कमेपैकी रक्कम रुपये ७,३००/–, ६७१.५७/– व ६५०/– ही JAITUN BIBI यांच्या Kamataka Bank Ltd. CUTTAK ORIASA या बॅकेमधील खाते क्र.9992505073797201 या बॅकेस आदेशीत करण्यात येते की, त्यांनी रक्कम रुपये ७,३००/–, ६७१.५७/– व ६५०/– ही अर्जदारास परत करावी.

६. सदरील रक्कमेपैकी रक्कम रुपये २०,०००/– ही SAMONIO MASIH यांच्या Punjab & Sind Bank MANDER MOGA Punjab याच्या कडील खाते क्र.14621000003445 या बॅकेस आदेशीत करण्यात येते की, त्यांनी रक्कम रुपये २०,०००/– ही अर्जदारास परत करावी.

७. सदरील रक्कमेपैकी रक्कम रुपये २९,९९८.४५/– ही KK ENTERPRIZES यांच्या Bank of Baroda (Including Vijaya Bank and Dena Bank) या बॅकेमधील खाते क्र.37400200000252 या बॅकेस आदेशीत करण्यात येते की, त्यांनी रक्कम रुपये २९,९९८.४५/– ही अर्जदारास परत करावी.

८. सदरील रक्कमेपैकी रक्कम रुपये १,०३०/– ही CSB Food यांच्या State Bank of India Chennuer, Telangana या बॅकेमधील खाते क्र.41982393463 या बॅकेस आदेशीत करण्यात येते की, त्यांनी रक्कम रुपये १,०३०/– ही अर्जदारास परत करावी.

९. तपासी अंमलदार यांनी उपरोक्त नमुद मुद्देमाल सुपूर्त नाम्यावर सोडण्यापुर्वी त्या बाबतचा सविस्तर पंचनामा करावा.

१०. अर्जदार यांनी न्यायालय आदेश करेल त्यावेळी त्यांना परत मिळालेली रक्कम न्यायालयात हजर करणे त्यांच्यावर बंधनकाकर राहील.

११. उपरोक्त मुद्देमालाचा वापर अर्जदार यांनी कोणताही गुन्हा करण्याकरीता करु नये, तपासी अंमलदार यांनी मुद्देमालाचा केलेला पंचनामा व सुपूर्तनामा बॉड दोषारोप पत्रासोबत दाखल करावा.

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.03.20 17:39:16 +0530

(**डी. एस. खोत** )

स्थळ – खालापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

दिनांक – २०/०३/२०२६. कोर्ट क्र.२, खालापूर.